# 'निर्माणा'त गुंतलेले हात

समाजातील सर्व प्रश्नांना सरकारच जबाबदार आहे असे मानणारा एक मोठा वर्ग आपल्याकडे आहे. समस्यांची केवळ दुरूनच चर्चा करायची; पण कृती मात्र शून्य, अशी यांची भूमिका असते. याच पार्श्वभूमीवर एक असाही वर्ग आहे जो या समस्यांविषयी केवळ बोलण्याऐवजी त्यांना थेट भिडू पाहतो आहे. मुख्य म्हणजे हा युवा वर्ग आहे. शब्दांचे इमले उभारण्यापेक्षा प्रत्यक्ष 'निर्माणा'त गुंतलेल्या या हातांच्या जडणघडणीमागची कहाणी.

■ प्रतीक पुरी





**भारत हा युवकप्रधान** देश आहे. युवा पिढीच देशाचे भवितव्य ठरवणार आहे. ही जबाबदारी पेलण्यासाठी युवक सक्षम आहेत का, त्यांना खरोखरच ही जबाबदारी उचलायची आहे का, या प्रश्नाकडे मात्र कोणाचे लक्ष जात नाही. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात एक अभिनव चळवळ गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. तरुणाईचेच भविष्य नव्हे, तर समाजाचे आणि देशाचे भविष्य घडविण्यासाठीही ही चळवळ मोठे काम करत आहे. या चळवळीला भक्कम अशी नैतिक आणि सामाजिक बैठकही आहे. ही चळवळ आहे अर्थातच नवनिर्माण. म्हणजे युवकांची युवकांसाठी युवकांद्वारा चालवण्यात येणारी सामाजिक बदलासाठीची चळवळ.

अमृत बंग हा तरुण 'निर्माण'च्या समन्वयाचे काम गेली चार वर्षे करत आहे. बंग घराणे महाराष्ट्राला अपरिचित नाही. डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांची गडचिरोलीतील 'सर्च' संस्था गेली तीन दशके राज्यातील सामाजिक चळवळीत अग्रस्थानी आहे. आई-वडिलांची पुण्याई पाठीशी असली, तरी अमृतवर या पुण्याईचे दडपण नाही. त्याने त्याची स्वतंत्र वाट निवडली. 'बी.ई.' झाल्यानंतर पुण्यात सिमॅंटेक कंपनीत घसघशीत पगाराची नोकरी करत तो स्थिर झाला होता. या व्यावहारिक स्थिरतेबद्दल मात्र त्याच्या मनात प्रश्न पडत होते. आपण आपल्यासाठी नाही, तर कंपनीसाठी राबतोय, ही जाणीव त्याच्या मनात होती. कंपनीत काम करत असताना त्याला प्रश्न पडायचे, ''माझ्या कामाचा उपयोग काय? तो कोणाला होत आहे? परक्या देशातील लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी माझी बुद्धी का झिजवतोय? माझ्या अवतीभवती किती तरी लोक उपाशी आहेत, निरक्षर आहेत. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी माझ्या शिक्षणाचा उपयोग मी का करत नाही?'' असे प्रश्न अमृतला सतत छळत होते.

या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी अमृतने राजीनामा दिला. राजीनामा दिला, पण पुढे काय करायचे, हा प्रश्न अनुत्तरितच होता. सुदैवाने अमृतला जे प्रश्न पडत होते, ते इतर तरुणांनाही पडत होते. या प्रश्नांची उत्तरे त्यांनाही मिळत नव्हती. ती देण्याचा प्रयत्न केला डॉ. अभय बंग, डॉ. राणी बंग आणि विवेक सावंत यांनी. प्रश्न पडला, तर भावनेच्या आहारी न जाता त्यावर बुद्धिनिष्ठ आणि व्यावहारिक समाधान शोधून काढणे, याकडे या तिघांचाही कल असायचा. समाजासाठी काही करू इच्छिणाऱ्या तरुणांना एक दिशा व व्यासपीठ देण्याचे काम बंग दांपत्य आणि सावंत यांनी केले.

'ज्यांना समस्या सोडवायच्या आहेत, त्यांच्यासाठी समस्यांहून अधिक काय पाहिजे,' ही डॉ. अभय बंग यांची भूमिका, तर 'अर्थवादी युवकांना अर्थपूर्णतेकडे न्यायला हवे,' असे विवेक सावंत सांगत. दोघांच्या या म्हणण्यातच 'निर्माण'ची भूमिका लपलेली आहे.

जे तरुण भौतिकदृष्ट्या स्थिर झाले आहेत; पण मानसिकदृष्ट्या अस्थिर आहेत, त्यांना अर्थपूर्ण जगण्यासाठी दिशा दाखवावी, या भूमिकेतून जून २००६ मध्ये 'निर्माण'ची स्थापना करण्यात आली. सभोवताली दिसणाऱ्या समस्यांनी अस्वस्थ होणारे तरुण शोधणे, त्यांना एकत्र करून या समस्या सोडविण्यासाठी उद्युक्त करणे- मदत करणे, हाच 'निर्माण'च्या कामाचा उद्देश होता. निर्माण ही एक शैक्षणिक प्रक्रिया आहे. अमृत हा 'निर्माण'च्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी. तो सांगतो, ''ज्यातून 'स्व'ची ओळख होईल, अशी तरतूद सध्याच्या शिक्षणव्यवस्थेत नाही. स्वतःला स्वतःची ओळख व्हावी, तसेच समाजाची गरज ओळखून त्यातील काही प्रश्नांवर काम करायला उत्सुक असणाऱ्या तरुणांना आपल्या आयुष्याचा उद्देश कळावा, यासाठी 'निर्माण' मदत करते.''



## उत्तरासाठी 'निर्माण'

**अमृतला जे प्रश्न पडत होते, ते इतर तरुणांनाही पडत होते. या प्रश्नांची उत्तरे त्यांनाही मिळत नव्हती. यातील अनेक तरुण भौतिकदृष्ट्या स्थिर होते; पण मानसिकदृष्ट्या अस्थिर होते. या तरुणांच्या आयुष्याला दिशा द्यावी, याच भूमिकेतून 'निर्माण'च्या कामाची सुरवात झाली.**

- 'निर्माण'मुळे वाईटाला वाईट म्हणण्याचे व चांगल्या कामात स्वतःला झोकून देण्याचे धैर्य तरुणांमध्ये निर्माण होत आहे. आपल्याला नक्की काय करायचेय, याची स्पष्टता त्यांच्या मनात तयार होत आहे.



'निर्माण'च्या प्रक्रियेतून गेल्यानंतर २००८ पासून अमृतने 'निर्माण'च्या संघटनात्मक कामात लक्ष घालायला सुरवात केली. आज 'निर्माण'ला तो स्वतःचा प्रकल्प समजतोय, स्वतःच्या अर्थपूर्ण जगण्याचा.

## निर्माणमध्ये कसे यावे?

'निर्माण' हा सर्चचा उपक्रम असला, तरी तो सर्चपुरता किंवा गडचिरोलीपुरता मर्यादित नाही. महाराष्ट्रातील तीसपेक्षा जास्त नामवंत संस्था 'निर्माण'शी जोडल्या गेल्या आहेत. महात्मा गांधी आणि विनोबांनी जी 'नयी तालीम' नावाची शिक्षणपद्धती सुचवली होती, तिचे एकविसाव्या शतकातील स्वरूप म्हणजे 'निर्माण'. नयी तालीमच्या 'जगण्याकरिता शिक्षण, जगण्याद्वारा शिक्षण आणि जीवनभर शिकत राहणे,' या तत्त्वावर निर्माणची मांडणी केलेली आहे. वैज्ञानिक संस्कारांवर ही मांडणी आहे. अमृतसोबत अमिताभ खरे, सायली ताम्हणे आणि उमेश खाडे हे निर्माणचे संघटन व समन्वयाचे काम सांभाळतात. सर्वांशी चर्चा करून 'निर्माण'च्या कामाची दिशा व धोरणे ठरवली जातात. तिच्या अंमलबजावणीची जबाबदारी या संघटन समितीवर असते. 'निर्माण'ची निवडप्रक्रियाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. ज्यांना 'निर्माण'मध्ये यायचे आहे, त्यांना आधी एक प्रश्नावली भरून 'निर्माण'कडे पाठवावी लागते. यातून निवडलेल्या तरुणांची, 'निर्माण'चे समन्वयक त्या त्या ठिकाणी जाऊन मुलाखती घेतात. कोणत्याही मुलाला त्यासाठी गडचिरोलीला जावे लागत नाही. या मुलाखतींमधून 'निर्माण'च्या शिबिरासाठी म्हणून अंतिम ६० जणांची निवड करण्यात येते. आपल्या आयुष्याचा अर्थ काय आहे, आपल्या जगण्याचे प्रयोजन काय आहे, याविषयी विचार करायला लावणे, हेच 'निर्माण'च्या मुलाखतींचे वैशिष्ट्य. शिवाय या पद्धतीच्या परस्पर संवादामुळे सामाजिक कामांविषयी त्यांचे गांभीर्य किती आहे आणि ते यात कायमस्वरूपी उतरणार आहेत की नाहीत, याचा अंदाजही येतो.

निवड झालेल्या तरुणांची (निर्माणींची) प्रत्येक तुकडी ही दर सहा महिन्यांनी होणाऱ्या ८-१० दिवसांच्या चार शिबिरांत प्रशिक्षण घेते. पहिल्या शिबिरात प्रत्येकाला स्वतःची ओळख, दुसऱ्या शिबिरात आजूबाजूच्या समाजाची ओळख, तिसऱ्या शिबिरात समाजातील वेगवेगळ्या प्रश्नांचे बौद्धिक विश्लेषण व त्याच्या केस स्टडीजचा अभ्यास, असे मार्गदर्शन केले जाते. शिबिराचा चौथा टप्पा हा सगळ्यांत महत्त्वाचा यात आपण काय करायचे, हे ठरवायचे असते. शिबिर संपल्यानंतर पहिल्या सहा महिन्यांत या 'निर्माणीं'नी परत गेल्यावर काय करावे, याचीही आखणी केली जाते. या शिबिरांतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे या तरुणांना चार ते पाच दिवस एका खेड्यात, एका कुटुंबात राहावे लागते. यात ते कुटुंब आपले मानून त्यांच्यासारखेच राहणे अपेक्षित असते. याचे कारण लोकांचे प्रश्न प्रत्यक्षात काय असतात, ते काय असतात, ते सोडवण्यासाठी काय करावे लागेल, याची जाणीव 'निर्माणीं'ना व्हावी, जी एरवीच्या जगण्यातून होत नाही. ''शिबिराच्या काळातच हे निर्माणी समाजातील वेगवेगळ्या समस्यांना भिडायला लागतात. त्यांना ज्या समस्या सोडवायच्या

■ सामाजिक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यावर 'निर्माण'चा भर असतो.



आहेत, त्यात काम करणाऱ्या संस्था व लोकांना ते भेटतात, त्यांच्यासोबत काम करू लागतात. या प्रश्नांकडे भावनेने नव्हे, तर बुद्धीने पाहता यावे, यासाठी वेगवेगळे तज्ज्ञ त्यांना मार्गदर्शन करतात. सामाजिक काम म्हणजे काही क्रांतिकारक, जगावेगळे काम नसून आपल्या समस्या व्यावसायिक पद्धतीने सोडवण्यावर इथे भर दिला जातो. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यावर निर्माणचा भर असतो. हीच निर्माणची मुख्य प्रेरणा आहे,'' असे अमृत सांगतो.

निर्माणच्या शिबिरांतून तावूनसुलाखून निघालेल्या निर्माणींपैकी ज्यांना पुढे जाऊन खरेच काही करायचे आहे, त्यांच्यासाठी चार पर्याय उपलब्ध असतात. पहिला : त्यांनी एखाद्या सामाजिक संस्थेत काम करावे. दुसरा : त्यांनी सरकारी यंत्रणेत सहभागी होऊन काम करावे. तिसरा : त्यांनी स्वतःच एखादे काम सुरू करावे आणि चौथा : एखाद्या समस्येची सोडवणूक करू इच्छिणाऱ्या निर्माणींना एक वर्षासाठी देण्यात येणारी 'निर्माण फेलोशिप'.

### निर्माण समुदाय

सामाजिक प्रश्न सोडवणे आणि नेतृत्वाची नवीन फळी तयार करणे हे 'निर्माण समुदाय'चे काम आहे. या माध्यमातून 'निर्माण'च्या कामाची व्याप्ती आणि खोली वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. या समुदायात राज्यातील दिग्गज सामाजिक कार्यकर्ते आणि संस्था एकत्र आलेल्या आहेत. यांच्यासोबत राहून 'निर्माणी' सामाजिक समस्या सोडवण्याचे व्यावहारिक शिक्षण घेत असतात. सामाजिक बदल व ते घडवून आणणारे लोक यांच्याशी या मुलांची भेट घडवून त्यातून त्यांच्यात सामाजिक भान निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम येत्या काळात राबविण्यात येणार आहे.

निर्माणची ही प्रक्रिया आतापर्यंत ३५० तरुणांनी अनुभवली आहे. त्यातील ४० तरुण-तरुणी कोणता तरी प्रश्न घेऊन त्यावर पूर्णवेळ काम करत आहेत. गाई-बैलांचे वाण कसे सुधारता येतील, यावर सजल कुलकर्णी काम करतो आहे. गडचिरोलीमध्ये मलेरिया आटोक्यात कसा आणता येईल, यावर चारुता गोखलेचे संशोधन सुरू आहे. माळढोक पक्ष्यांच्या संवर्धनासाठी प्रमोद पाटील धडपडतो आहे. संतोष गवळे आपल्या गावाचा विकास करण्यासाठी नवनवे प्रयोग करतो आहे. हे काम करताना त्यांच्यात कसलाही दांभिकपणा नाही, की आपण जे करतोय त्यासाठी चांगले म्हणावे, अशी अपेक्षाही नाही. 'निर्माण'मध्ये मी आहे, कारण माझ्यात धैर्य आहे. ज्याच्या बळावर मला मान्य नसणाऱ्या गोष्टी बदलण्यासाठी मी संघर्ष करतो आहे. मला हव्या असणाऱ्या बदलांसाठी मी झगडतोय. हे माझ्या आवडीचे काम आहे,' हीच या साऱ्यांची भूमिका आहे. 'निर्माण'मुळे आजच्या युवकांमध्ये वाईटाला वाईट म्हणण्याचे व चांगल्या कामात स्वतःला झोकून देण्याचे धैर्य निर्माण होत आहे. आपल्याला नक्की काय करायचेय, याची स्पष्टता त्यांच्या मनात तयार होत आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, अर्थपूर्ण आयुष्य जगण्याच्या पारंपरिक कल्पना बदलून वास्तव व व्यावहारिक, सांस्कृतिक बदल घडत आहे. समाजासाठी, देशासाठी युवा पिढीने भविष्याची जबाबदारी पेलण्यासाठी पुढे यावे ही निश्चितच आश्वासक बाब असते आणि 'निर्माण' ती पूर्ण करत आहे.

निर्माणची पुढची बॅच डिसेंबर २०१२ पासून सुरू होत आहे. ज्यांना यात सहभागी व्हायचे आहे, http://nirman.mkcl.org या वेबसाइटवर जाऊन फॉर्म भरून निर्माणला पाठवू शकतात. तसेच अमृत बंग : ९४२२५०१४९६ यांच्याशी संपर्क करू शकतात.

*युनिक फीचर्स*

## 'निर्माणीं'ची भूमिका

**माझ्यात धैर्य आहे म्हणून मी 'निर्माण'मध्ये आहे. या धैर्याच्या बळावर मान्य नसणाऱ्या गोष्टी बदलण्यासाठी मी संघर्ष करतो आहे. मला हव्या असणाऱ्या बदलांसाठी मी झगडतोय. कारण हे माझ्या आवडीचे काम आहे.**



**प्रश्न: आयुष्याची, करिअरची अत्यंत महत्वाची वर्षे सोशल कॉजला देताना भीती नाही वाटली? त्यावेळी फायद्यातोटय़ाचा काय विचार केला?**

Symantec या सॉफ्टवेअर कंपनीतला जॉब सोडून सोशल सेक्टर मध्ये पूर्ण वेळ उतरण्याचा निर्णय मी २००८ साली जेव्हा घेतला तेव्हा भीती काही वाटली नाही. आपण नेमके काय करणार, त्यातून नेमके काय होणार यासंबधी काही प्रमाणात साशंकता नक्कीच होती. पण त्यातील अनिश्चिततेची मजा ही चिंतेपेक्षा कितीतरी पटीने अधिक होती. Symantec मधील आय. टी. लाईफला मी एका वर्षाच्या आतच कंटाळलो होतो आणि भीती ही खरतरं याची होती की भरपूर पगार आणि सोईसुविधा यांमुळे मी इथेच अडकून पडलो तर....? त्या सुरक्षिततेच्या नादात जीवनात काही जास्त आव्हानात्मक आणि अर्थपूर्ण करण्याच्या संधींपासून मी परावृत्त झालो तर....?

आपण स्वत:च्या हिकमतीवर पैसे कमवू शकतो हा विश्वास आणि आर्थिक स्वावलंबनाची खात्री तर पटलीच होती. मग काही वेगळ करून बघण्याची याहून अधिक चांगली वेळ कुठली असेल?

...तर फायदा – तोटा या पद्धतीने विचार केला असता ज्याला कधीनाकधी सोशल कॉजसाठी काही करायाचे आहे त्यासाठी “आत्ता” हीच वेळ सर्वाधिक चांगली आहे या निष्कर्षाला मी आलो.

पण सोबतच फायदा – तोटा या पद्धतीच्या पलीकडील देखील निर्णयाची एक पद्धत आहे ती म्हणजे निकषाधारीत! काय काम करायचे हे ठरविण्याचे माझे निकष काय? केवळ स्वत:ची आर्थिक सुरक्षा/सुबत्ता की अजून काही?

एक इंजिनियर म्हणून I am trained as a problem solver. But whose problems and which problems? हा निर्णय मी माझा केला पाहिजे. माझी मूल्य काय, माझ्या priorities काय, या माझ्या कामाच्या निर्णयातून झळकतात.

मी कुठल्या लीडरशीपच्या सोबत काम करतो हा पण माझ्यासाठी महत्त्वाचा निकष आहे. सामाजिक कामात उडी घेताना काही great and glorious minds सोबत काम करायची संधी मिळणार, असे लोक ज्यांच्या कमिटमेन्ट आणि चारित्र्याविषयी मला प्रचंड

आदर आहे अशांच्या सोबत रहायला, त्यांच्या मिशनमध्ये योगदान द्यायला मिळणार हा माझ्यासाठी खूपच मोठा मुद्दा होता. या संधीच्या पुढे भीती कुठच्या कुठे पळाली...!

मला असं वाटत की मी जेव्हा सोशल कॉजसाठी आयुष्याची काही वर्ष (किंवा सगळीच!) द्यायची अस ठरवतो तेव्हा ही काही निर्वात पोकळीतील (vacuum) उडी नसते. त्या निर्णयाप्रत मी केवळ भावनेच्या भरात आलो असेल तर ठेच लागण्याची शक्यता भरपूर असते. पण त्या निर्णयामागे जर काही वैचारिक प्रक्रिया झाली असेल आणि तो पाया जर भक्कम असेल तर मग भीती देखील वाटत नाही आणि अडथळयामुळे निरुत्साही देखील वाटत नाही.

- अमृत बंग

**प्रश्न: "तुमच्या लेखी सामाजिक काम म्हणजे काय? त्याची गरज व व्याप्ती काय?"**

मला वैयक्तिकदृष्ट्या सामाजिक कामात आनंद मिळतो, हे काम आव्हानात्मक आहे व त्याची गरज आहे म्हणून समाधान लाभते, या गोष्टींच्या पलीकडे जाउन मुळात सामाजिक कामाची अथवा सामाजिक क्षेत्राची गरज काय यासंबंधी विचार करायची संधी या प्रश्नामुळे मिळाली.

समाजाला सुरळीत चालण्यासाठी गरजेचे असे कायदेकानून व नीती बनवणे हे प्रामुख्याने शासकीय क्षेत्राचे (Government Sector) काम आहे असे मला वाटते. लोकांना जगण्यासाठी आवश्यक अशा वस्तू व सेवा पुरवणे हे मुख्यत: खाजगी आणि व्यवसाय क्षेत्राचे (Private Sector) काम आहे. मग सामाजिक क्षेत्राची गरज आणि व्याप्ती काय? टिपिकल “सोशल वर्क” अशा निव्वळ भावनिकदृष्ट्या बुळबुळीत पद्धतीने न बघता “सोशल प्रॉब्लेम सॉल्विंग” अशा दृष्टीने विचार केला असता मला या कामाचे खालील पैलू जाणवतात:-

1. समाजातील सर्वात गरजू आणि राजकीय / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आवश्यक सेवा पुरवणे, कारण सहसा शासन व बाजार व्यवस्था यांच्यापर्यंत पोहोचत नाही.

2. सत्तेचा असमतोल आणि विषमता दूर करण्याच्या उद्देशाने लोकांना सक्षम करणे आणि विकेंद्रीकरणाच्या व लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला बळकट करणे.

3. सामाजिक समस्या सोडविण्यासाठी विविध प्रकारचे तांत्रिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक असे कल्पक व नाविन्यपूर्ण उपाय शोधणे.

4. समाजाच्या भल्यासाठी योगदान देण्याच्या, आपला वाटा उचलण्याच्या अनेकाविध लोकांच्या इच्छेसाठी एक “चॅनेल ऑफ एक्स्प्रेशन” म्हणून काम करणे. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक, आर्थिक दाते, हितेच्छूक लोक, जागरूक नागरिक, अशा विविध मंडळींचा समावेश होईल ज्यांना त्यांच्या समाजाप्रतीच्या उत्तरदायीत्त्वाच्या पूर्तीसाठी मदतरूप असे एक माध्यम म्हणून सामाजिक क्षेत्र उपयुक्त ठरते.

5. मानवी समाज आणि संस्कृती ज्या अनेक मूल्यांना महत्त्वाचे मानते (उदा. त्याग, परोपकार, शौर्य, साधेपणा व शुचिता, इ.) त्यांची कायम जाण राहावी म्हणून, ज्यांच्याकडे समाज एक आदर्श म्हणून बघू शकेल, ज्याद्वारे समाजाची नैतिक उंची वाढत राहील असे व्यक्ती आणि कृतींच्या रूपातील “रोल मॉडेल्स” समाजापुढे येत राहावेत म्हणून.

6. जेव्हा कुठे अन्याय होत असेल अशा प्रसंगी “जागल्या” (whistle blower) म्हणून भूमिका पार पाडणे.

- अमृत बंग

**प्रश्न: आयुष्यात सेटल होणे म्हणजे काय?**

निव्वळ भौतिक निकषांचा विचार केला असता, समाजाला एखादे उपयुक्त योगदान देउन त्याद्वारे मिळणा-या मोबदल्यातून जेव्हा मी माझ्या स्वत:च्या जगण्याच्या किमान गरजा पूर्ण करू शकतो तेव्हापासूनच खरतरं मी सेटल झालोय असे मला वाटते. म्हणजे वयाच्या साडे-एकवीसाव्या वर्षी (२००७ साली) जेव्हा मी पहिला जॉब सुरु केला आणि आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झालो (आर्थिक समृद्धी नसली तरीही) तेव्हापासूनच! (इथे “समाजाला उपयुक्त योगदान” म्हणजे काही फक्त “समाज सेवा” असायची गरज नाही तर ज्याला म. गांधी “socially useful productive work” म्हणायचे असले कुठलेही काम.)

हे आर्थिक स्वावलंबन मला फार महत्त्वाचे वाटते, विशेषत: भारतीय मानस आणि पालक – पाल्य नाती लक्षात घेउन. अपत्यावरील प्रेमाच्या कल्पनेखातर स्वत:च्या मुलाला/मुलीला जीवनाच्या जबाबदारीपासून दूर ठेवण्याचा पुरेपूर प्रयत्न आज होताना दिसतो आणि तरुणांसाठी देखील हे पलायन सोईस्कर ठरते. आणि म्हणूनच काही बेसिक डिग्री झालेली असूनही कुठलेही काम न करता, भविष्यात एकदाचे ‘नीट सेटल’ होण्याची वाट बघत, सध्या

मात्र आई-वडिलांच्या पैशाच्या बळावर निव्वळ परीक्षार्थी म्हणून जगणाऱ्या तरुण – तरुणींचा आपल्याला सुळसुळाट दिसतो. सोबतच नवीन काहीतरी प्रत्यक्ष करून बघण्याची रिस्क न घेता “सध्या आम्ही अजून काही सेटल नाहीत हो...” असे अगदी मध्यमवर्गीय पालुपद अनेक जण लावतात ज्यांची खरतरं परिस्थिती बऱ्यापैकी नीट असते.

पुढे कधीतरी सेटल होण्याच्या अवाजवी अपेक्षा तयार करून तरुण वयातील कृतीशीलता व जीवनाविषयक प्रयोगशीलता खुंटून टाकणे हे मला योग्य वाटत नाही. आकान्क्षांपेक्षा गरजांवर आधारित सेटल होण्याची कल्पना कदाचित आमच्या तरुण पिढीला अधिक लवकर जबाबदार बनवेल आणि ‘करके देखो’ वृत्तीसाठी आवश्यक मानसिक धैर्य देईल. सोबतच स्वत:कडे वंचकाच्या नजरेतून न बघता अधिक आत्मविश्वासाने व आपल्या मूल्यविवेकानुसार पुढील वाटचाल करण्यासाठी मदत करेल असे मला वाटते.

आता परत स्वत:बाबतीत. आधी सांगितल्याप्रमाणे भौतिक निकषांवर आधारित सेटल होण्याचा माझा पहिला महत्त्वाचा टप्पा एकदा पार केल्यानंतर (वय वर्ष साडे २१) त्यापुढे सेटल होणे ही माझ्यासाठी उत्तरोत्तर चालु असलेली एक प्रक्रिया ठरली आहे (सोबतच काही ‘अन-सेटल’ होण्याचे धक्के पचवून देखील). आता मात्र तिचे स्वरूप हे जास्त वैचारिक आणि भावनिक आहे.

स्वत:च्या अंतर्बाह्य स्वरूपाविषयी आणि अस्तित्वाविषयी कम्फर्टबल असणे, सुयोग्य जोडीदार असणे, सभोवतालच्या समाजासोबत समरसून जगण्याविषयी सकारात्मक उर्जा असणे, *‘त्या तिथे दूर कुठेतरी भारी काही तरी चालू आहे आणि मी आता आहे तिथे जणू मी खूप काही मिस करतोय’* अशी कायम असुरक्षिततेची वा अपूर्णत्वाची भावना नसणे, इ. हे मी या प्रक्रियेतील भावनिक अंग म्हणेन.

मी करत असलेल्या कामातून मला हेतू आणि अर्थ (purpose and meaning) गवसतो आहे का, माझी मूल्य – कौशल्य – आणि समाधान यांचा मेळ घातल्या जातोय का, हे जग कसे चालते याविषयीची माझी समज उत्तरोत्तर परिपक्क होतेय का पण सोबतच जगाविषयीचे कुतूहल आणि मी याचा एक भाग आहे ही ‘being connected’ ची धारणा घट्ट आहे का, इ. हे मला सेटल होण्यातले वैचारिक अंग वाटतात.

- अमृत बंग

**प्रश्न: चांगले वाचन करायचे म्हणजे नेमकं काय? ते तुम्ही कसं ठरवता? तुम्हाला त्याचा कसा उपयोग होतो?**

आपण बहुतांश लोक हे सामान्य असतो. आपल्या अवतीभोवती असलेल्या सामान्यत्वाच्या पलीकडे जाउन उत्तुंग व्यक्तीत्त्वांना, विचारांना भेटण्याची सुवर्णसंधी पुस्तके आपल्याला देतात. स्थळ-काळाच्या मर्यादा ओलांडून मानवी संस्कृतीतील विविध रुपातले सत्व चाखण्याची संधी पुस्तकांमुळे मिळते. मोठे उपकारच हे आपल्यावर!

वाचन ही एक सिरीअसली करण्याची गोष्ट आहे असे मला वाटते. आणि म्हणून मी इंजिनियरिंगला गेलो (२००३) तेव्हापासून आत्तापर्यंत मी वाचलेले प्रत्येक पुस्तक मी नोंदवून ठेवले आहे. दर वर्षी किती वाचलं, काय वाचलं, आता अजून काय वाचायला पाहिजे, माझी विश लिस्ट काय, हे सगळ मॉनिटर करायला मला आवडत.

मी विविध कारणांसाठी वाचतो. पण अगदी मुख्य अशी तीन कारणं सांगायची तर:

1. माझ्या ज्ञानाच्या/विचारांच्या/कुतूहलाच्या कक्षा रुंदावणे – हे जग कसे चालते हे समजून घेणे

2. एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून अधिक उन्नत होणे – साहित्य, विशेषत: फिक्शन हे यासाठी खूप मदत करते

3. काही विशिष्ठ विषयांबाबतीत माझी समज व कौशल्य वाढवणे – हे प्रामुख्याने माझ्या कामाशी निगडीत असे वाचन

- अमृत बंग

# सामान्यांच्या आरोग्य गरजा आणि बॉण्डचे त्रांगडे!

**विधानसभेत आमदार विवेक पंडित यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री सुरेश शेट्टी यांनी 'डॉक्टर्सच मिळत नाहीत, मी काय करू?' असे हतबल उद्‌गार अलीकडेच काढलेत. आरोग्यमंत्र्यांच्या या उद्‌गारामुळे महाराष्ट्र राज्याची डॉक्टरांच्या संदर्भात काय परिस्थिती आहे, याबद्दल संभ्रम उत्पन्न होऊ शकतो. आरोग्यमंत्र्यांचे हे उद्‌गार हास्यास्पद तर आहेतच पण त्यातून गंभीर परिणाम निर्माण होऊ शकतात. एकूणच राज्यातील नागरिकांची आरोग्यसेवेची गरज, उपलब्ध आरोग्य सेवा याविषयी अधिक स्पष्टता निर्माण व्हावी यासाठी हा प्रपंच...**



**अमृत बंग**
mtngpletters@gmail.com

भारत सरकारच्या नॅशनल कमिशन ऑन माइक्रोइकॉनॉमिक्स अ‍ॅण्ड हेल्थच्या रिपोर्टनुसार, आज आपल्या देशातील एकूण बाह्यरुग्ण तपासणीतील ७८ टक्के रुग्ण हे खासगी क्षेत्र तर केवळ २२ टक्के रुग्ण सरकारी व्यवस्थेद्वारे तपासले जातात. वैद्यकीय सेवेवरचा खर्च न परवडल्यामुळे दरवर्षी देशभरात ३ ते ४ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले जातात. या देशातील विशेषतः गरीब व ग्रामीण नागरिकांना कोणत्या प्रकारची आरोग्यसुविधा पुरवली जाते याची ही एक झलक आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर ग्रामीण भागात चांगल्या डॉक्टर्सची आणि शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांची वानवा ही केवळ गडचिरोली-मेळघाटपुरती मर्यादित नसून, दुर्दैवाने अख्ख्या राज्याला त्याचा ताप भोगावा लागतो आहे. रुग्णालयांच्या इमारतींच्या हार्डवेअरवर कुशल माणसांचे सॉफ्टवेअर उपलब्ध झाले किंवा केले नाही तर सावळागोंधळ होतो. ही स्थिती सुधारण्यासाठी पावले उचलली जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्वदूर पसरलेल्या रिक्त जागांसाठी डॉक्टर्सच मिळत नाहीत, असे आरोग्यमंत्री म्हणताहेत. खरेच ही वस्तुस्थिती आहे काय? तर मुळीच नाही. यासाठी दरवर्षी गरजेइतके डॉक्टर्स तयार होत आहेत आणि त्यांना शासकीय सेवेत वर्षभर रुजू करण्यासाठीची कायदेशीर व्यवस्थाही आहे. पण मग घोडे नेमके अडले कुठे, हा प्रश्न आहे.

| महिना व वर्ष | एमबीबीएस डॉक्टरांच्या रिक्त जागा |
|---|---|
| डिसेंबर २००७ | ६४७ |
| जुलै २०१० | ७०९ |
| जुलै २०११ | १२४८ |
| एप्रिल २०१२ | ८६१ |

आपल्या राज्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालय यात मिळून सुमारे ४ हजार ५०० डॉक्टर्सच्या जागा रिकाम्या असल्याचे एका वृत्तपत्राने अलीकडेच सरकारच्या लक्षात आणून दिले होते. ही परिस्थिती केवळ या वर्षीचीच नाही. गेले अनेक वर्षे असाच गलथान कारभार सुरु आहे. आरोग्य सेवा संचालनालयाकडून माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त झालेल्या माहितीनुसार, गेल्या चार वर्षांत केवळ एमबीबीएस डॉक्टरांच्या ३ हजार ४६५ जागा (बघावा सोबतचा तक्ता) रिक्त आहेत. आपल्या राज्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालय यात मिळून ५ ऑक्टोबर २०११ रोजी एकूण १ हजार ४५१ डॉक्टर्सच्या जागा रिकाम्या आहेत, असे खुद्द वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने मुंबई उच्च न्यायालयाला दिलेल्या आकडेवारीत म्हटले आहे. (संदर्भ : The judgment given by The Hon'ble Court Of judicature At Bombay on 20 th Oct, 2011, in response to writ petition no. 1440 of 2011).

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये डॉक्टर्सचा तुटवडा बघून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमबीबीएस करुन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी एक वर्ष शासनाची सेवा करावी अन्यथा पाच लाख रुपये भरावेत असा बॉण्ड या विद्यार्थ्यांकडून सन २००४-२००५ पासून लिहून घेतला जात आहे. २००८-२००९ पासून बॉण्डची रक्कम वाढवून दहा लाख रुपये करण्यात आली आहे. (संदर्भ : शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ८ फेब्रुवारी २००८) शासकीय महाविद्यालयातून एक डॉक्टर घडविण्यासाठी सबसिडीच्या माध्यमातून २२ लाख रुपये खर्च केले जातात. (संदर्भ : लोकलेखा समिती, २०१०-२०११, बारावी महाराष्ट्र विधानसभा, पाचवा अहवाल) ही सबसिडी जनतेच्या करातूनच दिली जात असल्याने त्याची परतफेड म्हणून विद्यार्थ्यांनी ही शासकीय सेवा पूर्ण करावी असा हा विचार आहे. प्रत्यक्षात मात्र दिसते की बहुतांश विद्यार्थी ना ही सेवा देत आहेत ना बॉण्डची रक्कम भरत आहेत. राज्याच्या २००९-२०१०च्या कॅगने केलेल्या परफॉर्मन्स ऑडिट रिपोर्टनुसार ९० टक्के विद्यार्थ्यांनी या शासकीय सेवेकडे पाठ दाखविली आहे. (संदर्भ : Performance audit report of 2009-2010 for Maharashtra State by Comptroller and Audior General of India). राज्यातील १४ शासकीय व ४ महानगरपालिकेच्या अशा एकूण १८ वैद्यकीय कॉलेजेसमधून दरवर्षी सुमारे दोन हजार विद्यार्थी एमबीबीएस होऊन बाहेर पडतात. त्यानंतरदेखील इतक्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त असणे हे अतिशय आश्यचर्यजनक आहे. सोबतच, दरवर्षी २००० विद्यार्थी गुणिले १० लाख रुपये प्रत्येकी असे एकूण २ अब्ज रुयये शासकीय तिजोरीत जमा होऊ शकतात. पण तेदेखील झालेले नाहीत. मग घोडे नेमके कुठे अडले आहे? महाराष्ट्रात शासकीय वैद्यकीय कॉलेजेसमधून दरवर्षी सुमारे एक हजार डॉक्टर्स हे पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री वा डिप्लोमा घेऊन उत्तीर्ण होतात. त्यांनीही एक वर्षाची शासकीय आरोग्य सेवा करण्याचा प्रति व्यक्ती ५० लाख रुपये बॉन्ड मंजूर केलेला आहे. सोबतच सुमारे १०० डॉक्टर्स हे सुपरस्पेशालिटी करुन उत्तीर्ण होतात. त्यांचा एक वर्षाची शासकीय आरोग्य सेवा करण्याचा बॉन्ड तर तब्बल प्रति व्यक्ती दोन कोटींचा आहे. या सर्वांकडून बॉन्डची कठोर अंमलबजावणी करून घेतल्यास इतकी पदे रिक्त राहणे अशक्य आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात दरवर्षी प्रशिक्षित डॉक्टरांची फौज तयार करणारे महाराष्ट्र हे कदाचित देशातील एकमेव राज्य असेल. तरीदेखील आपल्याला ग्रामीण, आदिवासी भागात योग्य/पुरेशी वैद्यकीय सेवा उपलब्ध नाही, असे चित्र दिसते. यात नेमका दोष कुणाचा? राज्याचे आरोग्य सेवा संचालनालय आणि वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचा ढिसाळ, अपरादर्शक व अकार्यक्षम कारभार हा मोठा प्रश्न आहे. बॉण्डही केवळ कागदावर राहू नये. त्याची शिस्तशीर अंमलबजावणी होणे हे गरजेचे आहे. पण याबाबतीत दुर्दैवाने विद्यार्थांहूनही जास्त निरुत्साही शासनव्यवस्थाच दिसते. भारतासारख्या खंडप्राय देशाची आरोग्य ही खूप मोठी गरज आहे. वर उल्लेख केलेला कॅगचा रिपोर्ट असेही म्हणतो की जागतिक आरोग्य संघटनेने नामांकित केलेला डॉक्टर : पेंशट हा रेशो १ : २५० असताना महाराष्ट्रात तो १ : १,१९१ आहे. सर्वाधिक वाईट परिस्थिती ही आदिवास जिल्ह्यात आहे. गडचिरोली जिल्ह्यात तर हा रेशो १ : ११,००० आहे. वैद्यकीय शिक्षणावर दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करुनही आपल्या राज्यावर इतकी लाजिरवाणी स्थिती का ओढवावी? सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, डॉक्टर्स आणि गरजू समाज यांच्यात इतकी दरी का निर्माण व्हावी, सारे प्रश्नच आहेत. 'डॉक्टर्सच मिळत नाहीत, मी काय करू?' असे उत्तर देणे ही पळवाट आहे. डॉक्टर्स तर या राज्यात आहेत. प्रश्न राजकीय इच्छाशक्तीचा, प्रशासकीय व्यवस्थेचा आणि लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या जबाबदारीचा आहे. याबद्दल काय करणार?

(लेखक हे 'सर्च-निर्माण'चे समन्वयक आहेत)

## युनिक फीचर्सने घेतलेली मुलाखत:

सामाजिक काम या कल्पनेला आपण उगाचच एका संकुचित चौकटीत बसवतो, असं मला वाटतं. समाज ही एक खूप व्यापक आणि सर्वसमावेशक संकल्पना आहे. आपण प्रत्येकजण समाजाचा एक भाग असतो. त्यामुळे आपण करत असलेलं काम, आपल्या समोरचे प्रश्नं हे सगळं 'सामाजिक' असतंच. पण सर्वसामान्यपणे सामाजिक क्षेत्राचा उल्लेख केला की हे आपल्यासाठी नाहीच, सामाजिक कार्यकर्ता हे काहितरी वेगळं प्रकरण (त्यात हा लष्कराच्या भाकऱ्या भाजतो अशीही एक भावना असते.), सामाजिक काम म्हणजे काही तरी ठराविक साच्यातलं, ठराविक प्रश्नांवरचं, असंच आपल्यापैकी खूपजणांना वाटत असतं. कारण आपण आपल्या आजुबाजूच्या प्रश्नांचा भाग बऱ्याचदा असतो पण उत्तरांचा भाग असत नाही. पण हा साचेबद्ध विचार बदलण्याची गरज आहे. ज्यांना समाजासाठी काही करण्याची इच्छा आहे, ज्यांना उत्तरांचाही भाग बनावसं वाटतं त्यांच्यासाठी आज अनेक पर्याय उपलब्ध होऊ शकतात. पण त्यासाठी आपल्याला नक्की काय करायचंय आणि आपण काय करू शकतो, हे स्वतःलाच स्पष्ट होण्याची गरज असते. 'निर्माण' हा महाराष्ट्रातील तरूण मुलामुलींना यादृष्टीने जास्तीत जास्त मोकळं करण्याचा, त्यांच्या विचारांमध्ये स्पष्टता आणण्याचा व त्यांना कृतीशील करण्याचा एक प्रयत्न आहे.

सामाजिक प्रश्नांनी अस्वस्थ होणारे, 'काहितरी' करायला हवं असं वाटणारे बरेचजण असतात. त्यांच्यापैकी थोडेचजण कृतीत उतरतात. अशा कृतीत उतरू इच्छिणाऱ्यांपैकीच गेल्या तीन-चार वर्षांमध्ये निर्माणशी संबंध आलेल्या तरूण मुलामुलींबद्दल मी सांगतो आहे.

आज खूप मोठ्या संख्येने मुलं सामाजिक कामांमध्ये भाग घेत आहेत असं काहीसं चित्र नाही. सत्तर-ऐंशीच्या दशकात अनेक सामाजिक चळवळी झाल्या तेव्हा मोठ्या संख्येने तरूणांनी सामाजिक कामांमध्ये उडी घेतली. आज असं काही होताना दिसत नाही. याचं एक कारण मला असं वाटतं की, दरम्यानच्या काळात झालेल्या भांडवलशाहीच्या प्रसारामुळे 'पैसा मिळवणं हेच आमच्या आयुष्याचं एकमेव ध्येय आहे' हे एक तत्त्वज्ञान आमच्यावर बिंबवलं गेलंय. आम्ही घेत असलेलं शिक्षणसुद्धा याला हातभार लावतं. ते आम्हाला माहिती आणि कौशल्यं पुरवतं, पण त्यांचा उपयोग कशासाठी आणि कोणासाठी करायचा हे शिकवत नाही. निर्माणमध्ये आम्ही ही पोकळी भरून काढण्याचा काही प्रमाणात प्रयत्न करतो.

निर्माणला ॲप्रोच होणाऱ्या बहुतांशी मुलांमध्ये मला एक प्रकारची अस्वस्थता जाणवते. यातली बरीचशी मुलं मध्यमवर्गीय घरांतली असतात. आपल्या आजुबाजूचे प्रश्नं सुटले पाहिजेत, ते सोडवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत, असं त्यांना वाटत असतं. कुणाला एखादा विशिष्ट भाग खुणावत असतो. तिथे राहून काम करायचं असतं. बऱ्याच जणांना आपल्याला काय करायचयं हे नक्की कळत नसतं, पण काहितरी करण्याची इच्छा असते. या अस्वस्थतेला त्यांच्या टिपिकल कॉलेजलाईफमध्ये जागा नसते. कॉलेजच्या कट्ट्यावर बसून सामाजिक प्रश्नांवर बोलणं ही काही आज फॅशन नाही किंवा 'इन थिंग' नाही. मग ही अस्वस्थता तशीच दबलेली राहाते. अशी मुलं निर्माणमध्ये आल्यानंतर इथे त्यांना मोकळेपणाने बोलायला अनुकूल वातावरण मिळतं. समविचारी आणि समवयीन गट भेटतो. चांगलं काम केलेली माणसं भेटतात. यातून त्यांचे आतापर्यंत धूसर असलेले विचार स्पष्ट व्हायला मदत होते. या मुलांना त्यांच्याकडच्या ज्ञानाचा त्या त्या क्षेत्रामधली आव्हानं सुटण्यासाठी कसा उपयोग करता येईल, हा हेतू मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न करतो. निर्माणमध्ये आलेल्यांमध्ये इंजिनिअरींग आणि मेडिकलच्या विद्यार्थ्यांचं प्रमाण खूपच आहे. शिवाय फिल्म्स, लॉ, शेती, बायोटेक्नॉलॉजी, आयटी अशा वेगवेगळ्या शैक्षणिक पार्श्वभूमीची मुलंही

आहेत. तुलनेत चांगले आर्टस्‌चे विद्यार्थी मात्र सध्या जरा कमी आहेत. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागातली ही मुलं आहेत हे विशेष.

पण...मुलं निर्माणमध्ये आली, त्यांना चांगलं वातावरण मिळालं आणि ती एकदम समर्पित वृत्तीने कामाला लागली इतकं सगळं सरळ असतं का? तर नाही. कारण मुळात सामाजिक क्षेत्रात योगदान देणं याची प्रत्येकाची व्याख्या वेगवेगळी असू शकते. त्यांचे प्राधान्यक्रम वेगवेगळे असतात. काहीजणांमध्ये सामाजिक विकासासाठी काम करण्याची इच्छा तीव्र असते. असं समाधान देणारं काम हेच आपलं पूर्णवेळ करिअर बनवण्याची त्यांची तयारी असते. काही असे एका सरळ विचाराचे नसतात. त्यांच्यासाठी सामाजिक कार्य करणं हे जीवनातलं एक वर्तुळ पूर्ण करणं एवढ्याच पातळीवर असतं. करिअर, पैसा, घर...या गोष्टींबरोबर थोडंसं हे समाधानही असं. मग ते त्यांना जमेल तसा वेळ देतात. मुळात तुम्ही एखाद्या कामात झोकून देण्यासाठी तुम्हाला त्या गोष्टीची एक ओढ निर्माण होणं खूप गरजेचं असतं. थोडाच वेळ किंवा थोडाच काळ सुरुवातीला काम करणाऱ्यांसाठी ती ओढ निर्माण होण्याचा तो एक टप्पा असू शकतो, असं मी मानतो. यातूनच एखाद्याला आता हेच आपलं मिशन असं वाटणारी एखादी कल्पना 'क्लिक' होऊ शकते. अमिताभ खरे हा माझा वरिष्ठ सहकारी याचंच एक उदाहरण. सॉफ्टवेअर क्षेत्रात काही काळ उच्च पदावर काम करताना अमिताभ समाधानी नव्हता. त्याचा शोध चालू असताना तो निर्माणच्या संपर्कात आला आणि त्याने या प्रकल्पाच्या कोऑर्डिनेशनमध्ये मदत करायला सुरुवात केली. काही काळानंतर आपल्याला यापुढे अशाच प्रकारचं काम करायचंय हे त्याला स्वतःला पटलं आणि आता नोकरी सोडून तो बहुतांश वेळ निर्माणसाठी काम करतो आहे.

निर्माणी करत असलेल्या कामांमध्ये आणि विषयांमध्ये बरंच वैविध्य आहे. उदाहरणंच सांगायची तर सचिन बारब्दे, विठ्ठल साळवे, विक्रम सहाने, दिपक शिंदे, प्रियदर्श तुरे, पुनम संचेती, तेजश्री शेलार ही सरकारी नोकरीत असलेली, प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करणारी डॉक्टर मुलंमुली. गडचिरोली, मेळघाट, कोल्हापूर व कोकणातल्या मागास भागात वैद्यकिय सेवा देण्यासाठी स्वयंप्रेरणेने तिथे गेली आहेत. सजल कुलकर्णी हा आमचा मित्र जनावरांच्या वाणावर आणि त्यांची दूध उत्पादन क्षमता कशी वाढवता येईल यावर संशोधन करतोय. तो त्या विषयाने इतका झपाटला गेलाय की, तो कुठेही गेला तरी त्याच्या डोक्यात हा विषय असतोच. त्याला काय करायचंय याबद्दल त्याच्या डोक्यात आता अनावश्यक वैचारिक गोंधळ नाही. त्याच्या कामाची प्रेरणा त्याला सापडली आहे. अशी मुलं एका अर्थाने 'लकी' म्हणायला हवीत. बरेचजण नाहीतर चाचपडतच राहतात. धनंजय मुळी हा आयआयटीचा विद्यार्थी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल यासाठी प्रयत्न करतोय. शरद अष्टेकर हा गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये वाचन संस्कृतीचा प्रसार करत झटतो आहे. तन्मय जोशी हा शहरातल्या झोपडपट्टीतल्या मुलांसाठी रोजगाराचे नवीन पर्याय उभे करतोय, तर संदिप ढोले हा तसंच काम सांगली जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातल्या महिलांसोबत करतोय. यवतमाळ जिल्ह्यात मन्याळी या आपल्या गावाचा विकास करण्यासाठी संतोष गवळे हा मुलगा प्रयोगशील आहे. राजू भडके हा मुलगा ठाणे जिल्ह्यातील ऐन्याला प्रयोगशील शाळेत काम करतोय. आदिवासी समाजात मोठ्या संख्येने आढळणारा मलेरिया कसा कमी करता येईल यावर चारूता गोखले ही मुलगी संशोधन करते आहे. पर्यावरणाच्या विविध प्रश्नांवर अमृता प्रधान, मुक्ता नावडेकर या काम करताहेत. निखिल जोशी, अतुल गायकवाड आणि अश्विन भोंडवे ही इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी इंजिनिअर्स असलेली मुलं त्यांच्या ज्ञानाचा उपयोग मोबाईल फोनच्या माध्यमातून ग्रामीण लोकांचं आरोग्य सुधारण्यासाठी करत आहेत.

आपली सामाजिक कार्याची प्रेरणा आणि आपली उपजिविका याचा बऱ्याच जणांनी मेळ घातला आहे. स्वयंसेवी संस्थांशी जोडून घेणं, एखादी फेलोशिप घेऊन त्यामार्फत काम करणं, स्वतःच पुढाकार घेऊन नव्याने काही सुरू करणं आणि सरकारी संस्थांमध्ये जाऊन त्या यंत्रणेचा विकासासाठी उपयोग करणं या पद्धतींनी कामं सुरू आहेत. मुळातच फार चैनीच्या जीवनशैलीची अपेक्षा नसेल आणि व्यवस्थित भागेल इतकं उत्पन्न चालणार असेल तर हे सहज शक्य होतं. कदाचित अतिजास्त श्रीमंत जगणं जगता येणार नाही अशी कल्पना आम्ही त्याकरता आधीच देऊन ठेवतो. आपला उदरनिर्वाह आणि सामाजिक गरजांवर उपयोगी ठरतील अशा विविध व्यावसायिक प्रारूपांची (सोशल बिझनेस मॉडेल्स) त्यासाठी आम्हाला गरज भासते आहे. अशी नवीन नवीन प्रारूपं निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहोत. इतर कुणी केली असतील तर त्यांच्या शोधात आहोत. त्यामुळे सामाजिक काम करताना येणारे आर्थिक बाबींचे प्रश्नं हे आज तेवढे कठीण वाटत नाहीत. मला मात्र असं वाटतं, या आयोजनाच्या प्रश्नांपेक्षा प्रयोजनाचे प्रश्नं जास्त महत्त्वाचे आहेत. म्हणजे साधनसामुग्रीच्या अडचणींपेक्षा एखादं काम करण्यासाठी आमची योग्य मानसिकता असणं, त्यामागची कल्पना, हेतू, विचार हे स्पष्ट असणं हे जास्त आवश्यक आहे. कारण साधनांच्या अडचणी सोडवल्या जाऊ शकतात, पण कार्यामागचा हेतू/उद्देश नीट स्पष्ट नसेल तर गाडी कुठे ना कुठे अडकतेच.

सामाजिक प्रश्नांवर काम करणाऱ्यांमध्ये साधारणपणे जगाबद्दल एक व्यापक दृष्टी, विचार करण्याची क्षमता, 'नाही रे' वर्गाच्या विकासासाठीची तळमळ या गोष्टी असणं गरजेचं असतं. आजच्या तरूणतरूणींमध्ये ही तळमळ काही प्रमाणात असली तरी, बाकीच्या गोष्टींचा अभाव मात्र जाणवतो. आमच्या पिढीबद्दलच बोलायचं झालं तर आपल्या आयुष्याचा पैसा, करिअर, घर या रूटीन गोष्टीच्या पलिकडेही काही उद्देश असू शकतो याची बहुतेकांना जाणीवच नसते. मग तो उद्देश काय असू शकतो याचा विचार करणं ही खूपच लांबची गोष्ट. आपण करत असलेली नोकरी किंवा इतर काम हे आपण फक्त पगार मिळतो म्हणून करतोय की, त्यातून देशासाठी, समाजासाठी काही योगदान देतोय याचा विचार करण्याची गरज आम्हाला भासत नाही. सोबतच व्यावसायिक व वैयक्तिक जीवनातील उत्कृष्टतेचा ध्याससुद्धा फारसा दिसत नाही. याला आमच्या पिढीला लाभलेली शिक्षणाची पद्धत जबाबदार आहे, असं मला वाटतं. आपल्याला काय आवडतं, काय जमतं, हा विचार करायला आम्हाला कधी शिकवलंच जात नाही. आपला 'स्व' कसा आहे आणि आपल्याला काय येतं हे कशातून कळत जातं? जेव्हा आपण जास्तीत जास्त गोष्टींमध्ये भाग घेऊ तेव्हा. अवर सेल्फ इज लाईक लाईट. वुई डोन्ट सी लाईट बाय इटसेल्फ. वुई ओन्ली सी इट व्हेन इट इज रिफ्लेक्टेड फ्रॉम अँन ऑब्स्टॅकल. सिमीलरली वुई ओन्ली अंडरस्टँड अवरसेल्वज ट्रूली व्हेन वुई फेस अ चॅलेंज. पण गंमत ही होते की, अशा वेगवेगळ्या आव्हानांना आणि कृतींना आमची पिढी एक्सपोजच होत नाही. तथाकथित पुस्तकी शिक्षण घेण्यातच आमचा खूप वेळ वाया जातो.

जगात फोफावणाऱ्या पश्चिमी भांडवलशाहीच्या दृष्टिकोनाचाही आमच्या तरूण पिढीवर प्रचंड प्रभाव दिसतो. हा दृष्टिकोन आमच्यात 'चाईल्ड मेंटॅलिटी' भरतो आहे. लहान मुलाची मानसिकता ही फक्त घेण्याची असते. मला चॉकलेट खायला मिळावं म्हणून जणू काही जगाची रचना झाली आहे, असं त्याला वाटत असतं. जसजशी एखादी व्यक्ती प्रौढ बनते तसतशी ती 'देणारी' बनते. वाढत्या वयानुसार घेण्याकडून देण्याच्या मानसिकतेत प्रत्येक व्यक्तीचं हे संक्रमण होत असतं. पण आमच्या पिढीच्या बाबतीत ते जास्त अवघड बनतंय आणि लांबत जातंय.

उदाहरणच द्यायचं तर, सामाजिक कार्याला सुरूवात करणारी अनेक मुलंसुद्धा 'इथे मला काय शिकायला मिळेल' असाच विचार प्रामुख्याने करतात. 'मी काय करू शकतो, मी कुणाला काय देऊ शकतो' असा विचार तुलनेने कमी

आढळतो. खरं तर समाजातल्या बहुतांश लोकांची कुठलीही गोष्ट करताना मला त्यातून काय मिळेल, हीच भावना असते. मग सामाजिक क्षेत्रातही हा विचार डोकावणारच. ही मानसिकता मुख्यत्वे करून मुंबई-पुणे या मेट्रोपॉलिटन शहरांमधल्या मुलांमध्ये खूप दिसते. तिथे स्पर्धा असते. इतरांपेक्षा आपण पुढे असायला हवं हे त्यांच्यावर लहानपणापासून बिंबवलेलं असतं. 'घेण्या'चा स्वकेंद्रित विचार त्यातूनच येतो. तुलनेने ग्रामीण भागातून आणि नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, अमरावती, अकोला, जळगाव यांसारख्या मध्यम शहरांमधून आलेल्या मुलांवर या स्पर्धात्मक मानसिकतेचा प्रभाव मला एवढा जाणवत नाही. या मुलांनी वस्तूंच्या, सोयीच्या कमतरता पाहिलेल्या असतात. कठीण परिस्थिती म्हणजे काय, याची त्यांना थोडी तरी कल्पना असते. 'मी' च्या भावनेवर ते लवकर मात करू शकतात. याउलट मेट्रो सिटीज् मधली मध्यमवर्गीय आणि उच्चमध्यमवर्गीय मुलं. त्यांना सगळ्या सोयी, हव्या असलेल्या गोष्टी सहज मिळालेल्या असतात. निर्माणसाठी एकदा एका मुंबईच्या आणि आयआयटीमध्ये शिकलेल्या मुलाची मुलाखत मी तब्बल अडीच तास घेत होतो. मी एवढा वेळ त्याच्यासोबत काय करतोय याबद्दल इतरांना कुतूहल वाटत होतं. एवढा वेळ देऊनही मी बाहेर आल्यावर त्या मुलाला निर्माणमध्ये घ्यायला नकार दिला, तेव्हा सगळ्यांना जास्तच आश्चर्य वाटलं. आमच्या इतक्या वेळच्या संभाषणात हा मुलगा एकदाही स्वतःला विसरून बोलला नव्हता. त्याचा स्वकेंद्रीत नसलेला एखादातरी विचार मिळेल या आशेने मी त्याच्याशी इतका वेळ बोलत होतो पण तसं मला काहीच सापडलं नाही. ही 'मी' ची जाणीव किती खोलवर गेलीय, याचं मला भेटलेलं हे एक उदाहरण.

हल्ली करिअरचा विचार करताना मला काय आवडतं, तेच मी आयुष्यात करेन असा एक विचारप्रवाह दिसतो. पण फक्त एवढाच विचार अपुरा आहे. यासाठी आपल्या करिअरचं रूपक म्हणून एका रिक्षाचं उदाहरण आपण घेऊया. (हे उदाहरण माझे मेन्टर श्री. विवेक सावंत यांचं) 'मला काय आवडतं' हे या रिक्षाचं मागचं एक चाक आहे. दुसरं चाक आहे 'मला काय जमतं' हे. हे दुसरं चाक म्हणजे वस्तुस्थितीचा विचार असतो. पण यावर सहसा कुणी लक्ष देत नाही. कधी कधी 'मला काय आवडतं' याच्यापेक्षा 'मला काय जमतं' हे जास्त महत्त्वाचं असतं. ते करणं जास्त योग्यदेखिल असतं. या मागच्या दोन चाकांच्या आकारात खूप मोठा फरक असेल तर ती रिक्षा एकाच ठिकाणी गोलगोल फिरत राहील. म्हणून 'मला काय आवडतं' या रोमँटिक कल्पनाविलासासोबतच 'मला काय जमतं' हा कौशल्याचा भागदेखिल मजबूत करणं तितकंच महत्त्वाचं आहे. या रिक्षाचं सगळ्यात पुढचं चाक हे मात्र दिशादर्शक चाक आहे. ते सांगतं की, समाजात कशाची गरज आहे ते तुम्ही केलं पाहिजे. या तिन्ही चाकांची सांगड आपल्याला काय करायचंय, हे ठरवताना घालता आली पाहिजे. पण लोक बहुतेकदा 'मला काय आवडतं' या चाकावरच चालतात. सामाजिक कार्यात उतरू इच्छिणारी बरीचशी मुलंसुद्धा याला अपवाद नाहीत.

आमच्या पिढीचा आणखीही एक प्रॉब्लेम आहे. आम्हाला सगळं चटकन हवं असतं. एखाद्या कामाला सुरूवात केली की, लगेच त्याची फळं दिसायला लागावीत अशी साधारणपणे मुलांची अपेक्षा असते. आमच्या पिढीचा अॅट्रीशन रेट म्हणजे 'एखाद्या गोष्टीवर जास्त काळ टिकून न राहणं' जास्त आहे, असा नेहमीच आरोप होतो. सॉफ्टवेअरपासून सामाजिक कामांपर्यंत सगळीकडे ही परिस्थिती आहे. प्रत्यक्ष काम करताना अडचणी जाणवल्या की लगेच निराश व्हायला होतं. आपण समाजासाठी काहितरी त्याग करून आलोय, तेव्हा लोकांनीही आपल्याला सहकार्य करायला हवं असा थोडा सुप्त अहंकारही असतो. पण प्रत्यक्षात रिझल्ट दिसायला वेळ द्यावा लागतो हे स्विकारलं जात नाही. कधीकधी त्याची परिणती ही काम सोडून देण्यातही होते. 'इट टुक २५ इयर्स फॉर अॅन ओव्हरनाईट सक्सेस' हे जणू आम्हाला माहितच नाही. कुणी नवीन काम सुरू करून काही महिने झाले की, साधारणपणे पहिला नैराश्याचा टप्पा येतोच. मग अशा वेळी आम्ही त्यांना मानसिक टेकू लागतो. त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी मदत लागते. त्यातून

एकदा सावरलं, की मग मात्र विचारांमध्ये जास्त स्पष्टता येते. ही खरं तर एक शिकण्याची संधी असते. फ्रस्ट्रेशन येण्याच्या निमित्ताने आपण हे का करतोय, याचा विचार होतो. या 'का?' चं उत्तर प्रत्येकाचं वेगवेगळं असू शकतं. मात्र ज्याचं त्याला ते उत्तर मिळणं मात्र महत्त्वाचं असतं. हे शिक्षण असं अडचणीच्या रस्त्यांवरूनच होणं योग्य असतं. शेवटी गीता ही कृष्णाने युद्धभूमीवर, जिथे तिची गरज होती तेव्हा सांगितली म्हणूनच ती अर्जुनाला उपयुक्त ठरली. गीतेचे अ‍ॅडव्हान्समध्ये कोचिंग क्लासेस घेतले असते तर ती उपयोगी ठरली असती का?

सामाजिक प्रश्नांवर काम करू इच्छिणाऱ्या मुलामुलींना या 'का?' चं उत्तर शोधणं गरजेचं आहे. ते शोधल्यास 'काय?' आणि 'कसं?' ही उत्तरं मिळणं आपसूकच सोपं होतं. मात्र या तीनही प्रश्नांची उत्तरं ही आपल्या घरात, वर्गात किंवा एसी ऑफिसमध्ये किंवा 'स्व' च्या गुहेत बसून सापडणार नाहीत. त्यासाठी कर्मभूमीवरच उतरावं लागेल!

**– अमृत बंग**

# 'निर्माण' घडताना..     मायबोली इ-मासिकातील मुलाखत

गडचिरोलीच्या मागास आणि आदिवासी भागात सुमारे २५ वर्षांपूर्वी डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग या दोघांनी सर्च (शोधग्राम) ची स्थापना केली. आजचा त्यांच्या कामाचा आवाका पाहून अचंबित होतो आपण. त्यानंतर आजच्या तरुणांना दिशादर्शक म्हणून, आजच्या काळाशी सुसंगत एखादी चळवळ उभारावी या हेतूने 'निर्माण'चा जन्म झाला. शिक्षणाने संगणक अभियंता असलेला अमृत या उपक्रमाचे कामकाज बघतो आहे. फक्त अभय-राणी बंग यांचा मुलगा यापलीकडेही त्याची जी ओळख 'निर्माण'ने बनवलेली आहे, त्यासंदर्भात, त्याच्या विचारसरणी आणि जडणघडणीबाबत तसंच 'निर्माण'बाबत जाणून घेऊयात अमृतकडूनच.

**नमस्कार अमृत! 'निर्माण'ची मूळ संकल्पना काय आणि याची सुरुवात कशी झाली याबाबत सांगशील?**

'निर्माण'ची मूळ संकल्पना आहे ती आई-बाबांची (डॉ. राणी-अभय बंग). जून २००६ मध्ये त्यांनी 'निर्माण'ची सुरुवात केली. आई-बाबा ३०-३५ वर्षांपासून सामाजिक प्रश्नांवर काम करत आहेत, त्यांच्या पिढीतल्या असंख्य लोकांनी अशा विविध सामाजिक प्रश्नांवर काम केलेलं आहे. आता जे वेगवेगळे सामाजिक, वैज्ञानिक, तांत्रिक प्रश्न आपल्याला आजूबाजूला दिसतात, या प्रश्नांवर काम करायला नवीन पिढी कशी तयार होईल, या पिढीतल्या अशा मुलांचा शोध घेणं आणि त्यातून असा गट तयार करणं, हे 'निर्माण'च्या मागचं एक मुख्य उद्दीष्ट होतं. सध्या 'निर्माण'चा मूळ गाभा जरी तोच असला तरी त्यात बरेचसे बदल आणि सुधारणा कालौघात झालेल्या आहेत. नेमकं आपल्याला काय आणि कसं करायचंय याचा अंदाज हळूहळू येत गेला. दुसरा मुद्दा असा की, माझ्या पिढीचे महाराष्ट्रातले जे तरुण-तरुणी आहेत, त्यांच्यापैकी बऱ्याच जणांच्या भौतिक गरजा बऱ्यापैकी सुलभतेने पुऱ्या होत आहेत. त्यामुळे आयुष्यात काहीतरी अर्थपूर्ण करावं याचा शोध ही पिढी घेत असते. पूर्वी बहुतांशी

लोकांचा बराचसा वेळ हा रोजी रोटी कमावण्यात जात होता. आता जी अर्थव्यवस्था आपल्याकडे आहे आणि जे शिक्षण आपल्याला मिळालेलं आहे, त्यामुळे गुजारा करणं हे काही फारसं अवघड नाहीये. केवळ पैसा आणि करिअर याच्यापलीकडे काही आहे का याचा शोध घेणारी बरीच तरुण मंडळी समाजामध्ये आज आहेत. एका बाजूला हे तरुण आणि दुसऱ्या बाजूला प्रश्न सोडवणाऱ्यांची गरज या दोहोंचा मेळ घालायची आवश्यकता आहे.

**'निर्माण'ची व्याख्या कशी करशील तू?**

'निर्माण'ची व्याख्याच करायची झाली, तर 'निर्माण' ही समाजात बदल घडवू पाहणाऱ्या तरुणांना शोधण्याची, त्यांना संघटित करण्याची आणि त्यांची जोपासना करण्याची प्रक्रिया (To identify, organize and nurture youth) आहे. 'निर्माण'संदर्भात तीन प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील - 'निर्माण'च का, 'निर्माण' काय आहे आणि कशा प्रकारे 'निर्माण'मध्ये काम होतं. 'निर्माण'च्या माध्यमातून आम्ही कुठल्या समस्येचं उत्तर शोधू पाहतोय? तर 'निर्माण' ही एक शैक्षणिक प्रक्रिया आहे. आता आमच्या पिढीतले बहुतांशी जण हे दहावी-बारावी, मग कुठली तरी पदवी किंवा अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शाखेत किंवा अजून कुठेतरी जातात. डोळ्यांवर झापड बांधून आम्ही चाकोरीत अडकलेले असतो. आम्ही जर हा प्रश्न स्वतःलाच विचारला की आम्ही जे शिकतोय ते का, आणि त्याचा उपयोग काय, तर त्याचं उत्तर आमच्याकडे सहसा नसतं. आपली शैक्षणिक व्यवस्था आपल्याला खूप माहिती देते, जर आपण नशिबाने चांगल्या महाविद्यालयात गेलो तर सोबत काही कौशल्येही शिकता येतात. पण एक गोष्ट निश्चितपणे मिळत नाही, ती म्हणजे उद्दिष्टांची जाणीव. माझ्या शिक्षणाचा उपयोग काय, हे मला कळतच नाही. आणि आम्ही आमच्या आयुष्याचा अर्थ किंवा उद्दिष्ट शोधत नसल्याने आमच्या आयुष्याचं उद्दिष्ट दुसरे कुणीतरी ठरवतात. हे दुसरे म्हणजे कोण, तर आपल्या भवताली असलेली बाजारव्यवस्था. ती ठरवते की आमच्या आयुष्याचा हेतू काय? ही आम्हाला सांगते की बाबा रे, तू अमूक तमूक महाविद्यालयातून संगणक अभियंता झालास तर नंतर अमूक कंपनीत नोकरी करायला हवी, मग तू वर्षानुवर्षे तिथे राहा, स्वतःचा बंगला बांध किंवा अजून काही. किंवा मी जर एम.बी.बी.एस. करुन बाहेर पडलो, तर त्याला काही किंमतच नाही. मग मी एम.डी, सुपर स्पेशालिटी करुन, शहरामधल्या गर्दीत मी पण माझी एक पाटी लावून दवाखाना सुरु करायचा. किंवा पाटीवर पाटी, मजल्यावर मजले चढवत, माझी प्रॅक्टिस वाढवायची, जमलं तर 'कट' प्रॅक्टिस करायची आणि ऐष-आरामात जगायचं. म्हणजे आमचं आयुष्य ही व्यवस्थाच ठरवते. आणि खूप कमी वेळा आम्हाला आम्ही काय करायचंय हे ठरवायची संधी मिळते.

आता अजून एक गंमत आहे, मी जे काही आयुष्यात करेन असं म्हणतो ते मुख्यतः दोन गोष्टींवर अवलंबून आहे. एक म्हणजे मी कसा आहे, माझ्या व्यक्तिमत्त्वात काही विशेष गोष्टी असतील, काही कमतरता असतील. त्याच्या आधारावर ठरेल की मी काय करु शकतो, आणि दुसरा मुद्दा असा की बाहेरच्या समाजात कशाची गरज आहे? मी कशाची गरज असं जेव्हा म्हणतो तेव्हा कशाची कृत्रिम गरज आहे असं म्हणत नाहीये. म्हणजे बाजाराने तयार केलेली गरज अशा अर्थाने नव्हे. आता बघायला गेलं तर 'कोक' ही गरज आहे, की कृत्रिमरीत्या निर्माण केलेली गरज, हे ज्याच्या त्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. तर एक म्हणजे मी कसा आहे, आणि दोन म्हणजे समाजाची गरज, या दोहोंमध्ये जर मी पूल बांधू शकलो तर तो पूल हेच माझं करियर. हा पूल बांधायला मी उद्युक्त कसा होईन? दुर्दैवाने आमच्या शैक्षणिक प्रक्रियेत असा पूल बांधायला काही साधन उपलब्ध नाही. आमची शिक्षणव्यवस्था कधीच याचं भान करुन देत नाही की आम्ही कसे आहोत. पहिलीपासून ते पदवीपर्यंत हे भान मिळवण्यासाठी कुठलाच विषय अभ्यासक्रमात नसतो. सगळया परीक्षा कशा तर आम्ही काहीतरी रट्टा मारायचा आणि परीक्षेत जाऊन ओकायचा. पण माझा 'स्व' नेमका कसा आहे हे कुठेच येत नाही.

दुसरं म्हणजे समाजाची गरज काय आहे हे बघायचं असेल तर समाजात मिसळावं लागेल. आता आमच्या आयुष्याची पहिली ते पदवीपर्यंतची पंचवीस एक वर्षं शाळा-महाविद्यालय किंवा विद्यापीठाच्या आवारातच जातात. त्यामुळे प्रत्यक्ष आयुष्य कसं आहे हे आम्हाला कळतच नाही. जे कळतं ते फार फार तर प्रसारमाध्यमांमार्फत ज्या प्रतिमा आम्हापर्यंत पोचवल्या जातात त्याचमधून. तू दूरदर्शन पाहिलंस तर असं वाटेल की भारतात तरुण मुला-मुलींचं सुंदर असणं याची सर्वात जास्त गरज आहे. सर्वात जास्त जाहिराती प्रसाधनांच्याच असतात. जणूकाही तो आजचा कळीचा प्रश्न आहे. तर दोन समस्या अशा की शिक्षणव्यवस्थेत अशी काही तरतूद नाही, की ज्यातून आम्हाला आमच्या 'स्व' ची ओळख होईल आणि दुसरं म्हणजे समाजाला कशाची गरज आहे, किंवा वास्तव काय आहे, हे आम्हाला स्वतः अनुभवल्याखेरीज कळणार नाही. आता याला आपल्याला हाताळता येईल का, तरुण पिढी जी समाजातील प्रश्नांवर काम करायला उत्सुक आहे त्यांना त्यांच्या आयुष्याचा हेतू कळावा किंवा तो शोधण्याची त्यांची वाटचाल सुकर व्हावी यासाठी जी प्रक्रिया उभारली जातेय, ती म्हणजे 'निर्माण'.

**'निर्माण'चं नेमकं स्वरुप कसं आहे त्याबाबत सांगशील का थोडं?**

'निर्माण' ही काही नोंदणीकृत संस्था नाही. कार्यक्रमावर जास्त लक्ष देता यावं म्हणून मुद्दामच आम्ही असं केलं नाही. जरी हा 'सर्च' या संस्थेचा उपक्रम असला तरीही आम्ही आधीपासूनच ठरवलं होतं की 'निर्माण' फक्त सर्चपुरते किंवा गडचिरोली जिल्ह्यापुरते मर्यादित ठेवायचे नाही. सध्या महाराष्ट्रातल्या २० एक संस्था/तज्ज्ञ निर्माणशी जोडले गेलेले आहेत. महात्मा गांधी आणि विनोबांनी जी 'नयी तालीम' नावाची शिक्षणपद्धती सुचवली होती, की जिला आता Constructivist approach towards education (शिक्षणासाठीचा रचनात्मक दृष्टीकोन) असंही म्हणतात. तिचं एकविसाव्या शतकात महाराष्ट्रातल्या तरुणांसाठी जे स्वरुप असेल तशाच पद्धतीने आम्ही 'निर्माण'ची रचना केलेली आहे.

आता यामध्ये आमची काही गृहीतकं आहेत. ती काय तर, आपण जेव्हा म्हटलं मला माझ्या 'स्व' ची ओळख झाली पाहिजे, तर आम्ही असं मानतो की 'स्व' ची ओळख ही काही गुहेत बसून होत नाही. ' स्व' हा प्रकाशासारखा आहे असं आम्ही मानतो. आपल्याला निव्वळ प्रकाश दिसत नाही. जेव्हा प्रकाश एखाद्या वस्तूवरुन परावर्तित होईल, तेव्हाच ती वस्तू दृश्य होते आणि ती वस्तू जेव्हा दृश्य होते तेव्हा आपल्याला प्रकाश दिसतो. तसंच 'स्व' बाबत. म्हणजे चला, आता 'स्व' ला शोधू असं म्हटलं, तर तो सापडणार नाही. जेव्हा आव्हान सामोरं येतं, तेव्हा 'स्व' दृश्यमान होतो. तेव्हा कृतीमधून आणि आव्हानांना सामोरं जाऊनच त्याची ओळख पटते. आता इथे आव्हान म्हणजे प्रत्येक वेळेला समरप्रसंग असायची गरज नाही. छोटी आव्हानं किंवा कृतीही असू शकते. यात सहभागी होऊन त्यामार्फत मला जे समाजाचं दर्शन होईल, त्यातूनच मला माझ्या 'स्व'ची ओळख होऊ शकते. आता 'स्व'च्या शोधासाठी जेव्हा मी समाजात मिसळेन तेव्हा आपोआपच मला समाज कसा आहे ते ही कळेल. तेव्हा आपले जे दोन्ही प्रश्न होते त्यांचं एकच उत्तर आहे हे. म्हणून आम्ही 'निर्माण'मध्ये अशा प्रक्रियेला प्राधान्य देतो, की ज्यामध्ये समाजातील वास्तवाला जाऊन भिडायचं. म्हणजे प्रत्येक वेळी आकांडतांडव केला पाहिजे किंवा क्रांती केली पाहिजे किंवा मोर्चेच काढले पाहिजेत असं नाही. मी एक दोन उदाहरणं देतो - सरकारची प्राथमिक आरोग्य केंद्रावर काय व्यवस्था आहे, ते तिथं प्रत्यक्ष जाऊन पाहायचं. किंवा कचऱ्याची काय समस्या आहे, ते कचऱ्याच्या गाडीवर बसायचं कचरा कामगारांसोबत, आणि उरळी देवाचीला त्या ठिकाणच्या डंपिंग ग्राऊंडवर जाऊन बघायचं. तिथे मग कचऱ्याची समस्या काय, ते खऱ्या अर्थाने कळेल. तर अशा प्रकारच्या शिक्षणप्रक्रियेला आम्ही 'निर्माण'मध्ये उत्तेजन देतो.

आमच्यामध्ये असे भरपूर तरुण-तरुणी आहेत, जे मोठ्या कंपन्यांतली नोकरी सोडून 'निर्माण'ला आले आहेत. त्यामुळे आपल्या बौद्धिक क्षमतेचा आणि दिवसभरातील कामाचा काहीतरी अर्थपूर्ण उपयोग व्हावा ही त्यांची यामागची मुख्य प्रेरणा आहे. प्रश्नांकडे बौद्धिक दृष्टीकोनातून हाताळायला मुलांशी चर्चा करायला वेगवेगळे तज्ज्ञ 'निर्माण'च्या शिबिरात येतात. विवेक सावंत येतील आणि महाराष्ट्राचा माहिती तंत्रज्ञानविषयक निरक्षरतेचा प्रश्न कसा सोडवायचा यावर सांगतील, अनिल अवचट येतील आणि त्यांनी मुक्तांगणच्या माध्यमातून दारूच्या प्रश्नावर काय काम केलं आहे ते सांगतील, राजेंद्र सिंग येतील आणि पाण्याच्या प्रश्नावर त्यांनी राजस्थानमध्ये जे काम केलंय ते सांगतील, आनंद कर्वे येतील आणि ऊर्जेच्या प्रश्नावर बोलतील, अशी अनेक उदाहरणं आहेत. यामधून हे प्रश्न सोडवणं शक्य आहे, हा विश्वासही आमच्या मुलांमुलींत निर्माण होतो.

आमच्यावर झालेल्या वैज्ञानिक पद्धतीच्या संस्कारांनुसारच या प्रक्रियेची घडी बसवलेली आहे. त्यामुळे मनाला येईल ते करु असं न करता, प्रयोग करुन त्यांचं फलित काय ते बघून, त्यातून व्यवस्था सुधारत जायचं, असा आमचा खाक्या आहे. आमची 'निर्माण'ची संघटन समिती 5 लोकांची आहे. त्यांच्याकडे 'निर्माण'च्या रोजच्या कामकाजाची जबाबदारी आहे. त्यातला मी एक. अर्थात 'निर्माण'मध्ये आम्ही ज्यांना रिपोर्ट करतो ते म्हणजे डॉ. अभय बंग, डॉ. राणी बंग आणि विवेक सावंत. मुख्यत्वेकरून यांच्याबरोबरच्या चर्चेत गोष्टी निश्चित होतात. पण 'निर्माण'मधल्या संशोधकांचा गटाबरोबर तसंच गिरीश सोहनी, आनंद करंदीकर, सुहास कुलकर्णी, नंदा खरे इ. लोकांसोबतही आम्ही वेगवेगळ्या प्रश्नांवर चर्चा करतो. त्यांचीही मतं विचारात घेऊन त्याप्रमाणे बदल करतो. तसंच सहभागी मुलं-मुलीही अभिप्राय देतात. अशा सगळयातून कुठलाही निर्णय घेतला जातो. पण संघटन समिती तो राबवण्यासाठी जबाबदार असते.

**'निर्माण'च्या निवडप्रक्रियेबद्दल थोडं सांग.**

आम्ही जागोजागी महाराष्ट्रात 'निर्माण'ची माहिती देत असतो. मी वाचकांनाही आवाहन करेन की जे जे त्यांच्या माहितीतले १८ ते २८ वयोगटातील तरुण-तरुणी आहेत त्यांच्या पर्यंत 'निर्माण'ची माहिती जरुर पोचवावी. आमच्या वेबसाईटवर अर्ज आहे तो भरुन पाठवायचा असतो. ह्या अर्जात तुम्ही कसे आहात, तुम्हाला काय वाटतं यावर भर दिलेला आहे. आम्हाला त्या व्यक्तीला जाणून घ्यायचं असतं. यातले काही प्रश्न अर्थातच व्यक्तीला समाजाशी जोडतात. बरीचशी मुलं अर्जात शेवटी असंही लिहितात की 'तुम्ही आम्हाला निवडा किंवा निवडू नका, पण हा अर्ज भरतानाच आम्हाला खूप मजा आली आणि विचार करायला लागला'. बरेच हौशे-नवशे-गवशे ते प्रश्न बघून तिथेच गळतात.

त्यानंतर आमचा १० जणांचा गट महाराष्ट्रात जागोजागी जाऊन या मुलांच्या मुलाखती घेतो. मुलांना आम्ही प्रवास करायला लावत नाही, तर आम्ही त्यांच्याकडे जातो. तिथे मुलाखत घेतल्यावर आम्ही शेवटी ७० ते ८० मुलांची निवड करतो. आता 'निर्माण'ला ४-५ वर्षे झाल्यामुळे आमचे स्थानिक गट कार्यरत झालेले आहेत, आणि ही मुलं वेगवेगळया प्रश्नांवर काम करत आहेत. तर या मुलांबरोबर जोडले गेलेले तरुण हा ही आमच्या निवडप्रक्रियेतला मोठा घटक ठरतो. कारण त्यांनी 'निर्माण'च्या गटाबरोबर काम करुन स्वतःला सिद्धच केलेलं असतं. आम्ही बरेच चेकपॉईंट्स ठेवलेत, जेणेकरून ती व्यक्ती 'निर्माण'साठी योग्य आहे की नाही हे त्याला आणि आम्हालाही कळावं. महाराष्ट्राच्या विविध भागांमधून, जळगावपासून ते कोल्हापूरपर्यंत, भंडाऱ्यापासून ते अगदी सांगलीपर्यंत मुलंमुली येतात आणि या मुलांमुलींमुळेच या प्रक्रियेत जान येते. खरंतर तेच 'निर्माण'.

**पण 'निर्माण' फक्त तरुणांसाठीच आहे का मग?**

नाही, 'निर्माण' ही तसं बघायला गेलं तर एक वृत्ती पण आहे. ती काय म्हणते तर आंधळेपणाने आजूबाजूला जे सुरु आहे ते स्वीकारु नका, गोष्टींचा जरा वेचक-वेधक पद्धतीने विचार करुयात, फक्त आत्मकेंद्रित पद्धतीने न जगता आजूबाजूच्या लोकांचाही विचार करुयात, लोभ-आकर्षणांना बळी न पडता मी जरा अधिक उन्नत आयुष्याचा मार्ग चोखाळू शकतो का, हे चाचपून पाहूयात. हे तर प्रत्येकजण आपापल्या आयुष्यात करु शकतो. तरुण मुलामुलींचा हा जो अर्थपूर्ण जीवनाचा शोध आहे, तो आपणही करु शकतो. असा शोध घेणारे आणि समाजात सकारात्मक बदल घडविणारे सगळेच म्हणजे आमचा 'निर्माण' समुदाय. तेव्हा एखादी ४० वर्षांची व्यक्ती 'निर्माण'चा भाग होऊ शकत नाही असं नाही. त्याला शिबिरात सहभागी होता येणार नाही कदाचित, पण या समुदायाचा भाग होऊ शकतो. मी असंही म्हणेन 'निर्माण'चा अर्ज बाकीच्यांनी जरुर पहावा. कारण तो जरी आम्ही आमच्या मित्रांकडून भरुन घेत असलो तरी तो काही तेवढ्याच वयोगटापुरता मर्यादित नाही. आमचे जे प्रश्न आहेत ते विचार करायला लावणारे आहेत. ते प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारुन पाहिले तर बरीच विचारांची स्पष्टता यायला मदत होईल असं मला वाटतं तसंच कुणाला त्या प्रश्नांमध्ये काही सुधारणा किंवा बदल सुचवायचे असले तर त्या सूचनांचं स्वागतच आहे. दर वर्षी आम्ही नवनव्या सुधारणा घडवित असतोच.

**सुरु करताना काय अडचणी आल्या? येत आहेत?**

अडचणी म्हणायचं की काम करण्याजोगे प्रश्न म्हणायचं हे आपल्या वृत्तीवर अवलंबून आहे. तर अशी आव्हानं किंवा प्रश्न 'निर्माण'ची प्रक्रिया राबवताना आम्हाला सामोरे येतात. त्यातलं पहिलं आव्हान म्हणजे निवड. ज्यांना खरंच मनापासून असं काम करायचंय अशांना निवडणं. व्यक्तिमत्त्व विकास म्हणून किंवा चार मोठ्या लोकांची भाषणं ऐकूयात म्हणून 'निर्माण'ला कुणी यावं हे आम्हाला अपेक्षित नाही. पण अशा मुलांची पण बरीच संख्या असते. किंवा काही मुलं गोंधळलेलीच असतात आयुष्यात. त्यांची संख्या बऱ्यापैकी असते. पण जी खरीच वाहून घेतलेली, कष्टाळू आहेत, ज्यांनी छोटीमोठी धडपड सुरु केली आहे अशीही मुलं असतात. या सर्वांतून योग्य मुलं कशी निवडायची हा एक मोठा प्रश्न आहे.

दुसरी अडचण म्हणजे पैसा. ही सगळी प्रक्रिया चालवायला पैसा लागतो आणि तो सगळाच काही आम्ही मुलांकडून घेत नाही. आमच्या एक तुकडीचं एक शिबिर दहा दिवसांचं असतं. अशी चार वेळा शिबिरं म्हणजे चाळीस एक दिवस त्यांचा खर्च असतो. आणि त्यातला १/३ आम्ही मुलांकडून घेतो. त्यातही कुणाला जमत नसेल तर आम्ही शिष्यवृत्ती देतो. 'निर्माण'चा प्रसार करायचा, यातील संघटन गटालाही स्वतःला खर्च असतो, जागोजागी लोकांशी बोलायचं, तसंच काही मुलांना विद्यावृत्तीही देतो. या सगळयाला वर्षाला वीस एक लाखांवर आमचं अंदाजपत्रक असतं. त्यामुळं हे पैसे उभारणं हे कायमच एक आव्हान असतं.

ही एक शैक्षणिक प्रक्रिया असल्याने तिची फळं मिळायला किंवा दिसायला थोडा वेळ लागतो. ताप आला, पॅरासिटामोल दिली, ताप उतरला अशा पद्धतीचं हे काम नाही. एखादा मनुष्यप्राणी विकसित व्हायला, त्यामधले बदल दिसून यायला थोडा वेळ लागतो, त्यामुळे आज प्रक्रिया सुरु केली तर दोन-तीन वर्षांनी थोडेफार निकाल दिसू लागतात. त्यामुळे थोडी लांब पल्ल्याची प्रक्रिया आहे त्याला संयम लागतो. त्यामुळे अशावेळी विश्वास टाकणं किंवा मदत करणं याची खूप गरज असते.

**'निर्माण' मध्येच पूर्णवेळ काम करायचं हे कसं ठरवलंस? कधी?**

मी स्वतः पीआयसीटी या महाविद्यालयातून संगणक अभियांत्रिकीचं शिक्षण घेतलं आणि नंतर सिमँटेकमध्ये नोकरी करायला सुरुवात केली. मी तिथे आठ महिने काम केलं आणि नंतर कंटाळा येऊन राजीनामा दिला. मला तिथे गलेलठ्ठ पगार होता. पण मी करत असलेल्या कामाचा उपयोग काय आहे आणि कुणाला आहे याची सुतराम

कल्पना नव्हती. अमेरिकेत बसलेल्या कुणा गिऱ्हाइकाला कामकाज सोपं जावं म्हणून मी का सॉफ्टवेअर लिहू? माझ्या आजूबाजूला कितीतरी लोक उपाशी आहेत, कितीतरी लोकांना शिक्षणाची संधी नाहीये, कितीतरी लोकांवर अन्याय होतोय अशी सगळी परिस्थिती असताना मी कुठल्यातरी विचित्र समस्येवर काम करावं का? हा मला पडलेला प्रश्न होता. सगळयांनाच हाच प्रश्न पडावा असं नाही.

सुदैवाने आमच्या घरी स्वतंत्र विचारांची परंपरा आहे त्यामुळे घरातही कुणी कुणावर मतं लादत नाही. मी बारावीनंतर काय करावं, म्हणजे अभियांत्रिकी शाखेत जावं, का वैद्यकीय शाखेत जावं का क्रिकेटपटू व्हावं याबाबत आमच्या घरी पर्याय खुले होते. पण शेवटी निर्णय माझा मलाच घ्यायचा होता आणि आमच्या घरात असंही आहे की बाकीचे लोक त्यांचं मत जरुर मांडतील, पण शेवटी निर्णय ज्याचा त्यानं घ्यायचा आणि त्याबरोबरच त्याची जबाबदारीही स्वीकारायची. लहानपणापासून अशाच प्रकारे निर्णय घेतल्याने स्वतंत्र विचार करायचा हे तर होतंच. म्हणजे संगणक अभियांत्रिकीला प्रवेश हा निर्णय माझा होता, त्यानंतर सिमँटेकला नोकरी करण्याचा आणि ती सोडण्याचाही निर्णय माझा होता.

मी 'निर्माण'च्या आमच्या पहिल्या तुकडीचा विद्यार्थी. मी स्वतः 'निर्माण'मध्ये येताना मला नक्की काय करायचंय हे माहीत होतं असं नाही. आमचं पहिलं शिबिर हे १८ जून २००६ ला झालं. आणि त्यावेळी खूप व्यवस्थित निवडप्रक्रियाही नव्हती. पण अशा पद्धतीनं युवकांचं शिबिर होणार आहे आणि त्यात आपण काही मुद्दयांवर चर्चा करणार आहोत याची ढोबळ कल्पना होती. माझे मित्र, वर्गमित्र असे साठ-एक जण यात आलो. मी असा दावा मुळीच करणार नाही की आम्हा सगळयांना कल्पना होती की 'निर्माण' नेमकं काय आहे. पण ती एका शोधाची सुरुवात होती. दीड वर्षानंतर मात्र बऱ्यापैकी विचार झालेला होता. म्हणून मी निश्चय केला की आपण याच कामात उतरायचं आहे. तेव्हापासून म्हणजे २००८ पासून मी 'निर्माण'च्या संघटन गटाचा भाग आहे. मी स्वतःला काही 'निर्माण'च्या प्रक्रियेपासून वेगळा समजत नाही. मीही त्याचाच भाग. योगायोग असा की माझा प्रकल्पच 'निर्माण' आहे.

**या सगळयात आणि तुझी विचारांची बैठक तयार होण्यात अभय-राणी बंग यांचा हातभार किती? कशाप्रकारे?**

मी किंवा आनंद आम्ही त्यांची रक्ताची मुलं. पण निर्माण ही अशी प्रक्रिया आहे की जिच्या माध्यमातून बऱ्याच मुलामुलींना अभय-राणी बंग यांची मुलं व्हायची संधी मिळते. आमच्या घरी आम्ही त्यांना अम्मा-नायना अशी हाक मारतो. आता 'निर्माण'मध्ये येणारा प्रत्येकच मुलगा किंवा मुलगी त्यांना अम्मा-नायना म्हणूनच हाक मारतात. आणि त्याच पध्दतीचं त्यांचं नातं असतं. ते दोघं आमचे आई-वडील असण्याचा जो फायदा आम्हाला होतोय, तो फक्त आमच्यापुरताच का मर्यादित राहावा? तो अजून ४०० लोकांपर्यंत पोचावा. आता त्यातून नक्की काय घ्यायचं आणि त्याचा वापर कसा करायचा हे प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून असतं. मी केवळ अम्मा-नायना म्हणत त्यांच्या पदराला चिकटून राहू शकतो किंवा मी त्यांचं कामाला वाहून घेणं, त्यांचं 'करायचं ते सर्वोत्तमच' हा ध्यास, त्यांचं कठीण परिस्थितीतही न डगमगता काम करणं यामधून शिकून हे गुण माझ्याही अंगी बाणवू शकतो. पण त्यांचा सहवास आणि मार्गदर्शन ही मात्र सगळयाच निर्माणींसाठी एक सकारात्मक गोष्ट आहे.

आपण जे आहोत आणि आपलं व्यक्तिमत्व जसं आहे त्याचा वापर करुन जास्तीत जास्त चांगलं काम करुन स्वतःला कसं घडवू शकतो याचा ध्यास घ्यायचा, हे त्यांच्याकडून जरूर शिकण्यासारखं आहे. त्यांच्या कामाचं दडपण मात्र येत नाही. उलट त्याचा झाला तर सकारात्मक फायदाच होतो. दडपण येत नाही याची कारणं अशी असू शकतील की आमचा स्वतःवर असलेला विश्वास म्हणजे आपलं नाणं खणखणीत आहे तर आपण ते वाजवून घ्यायचं नीट. आणि जे काम करतो आहे त्यामागची भूमिका आणि विचार जास्त महत्त्वाचा आहे. लोक त्यावर

काय म्हणतात हे तुलनेनं दुय्यम आहे. मी जे काम करतो आहे त्यामागं माझी वैचारिक सुस्पष्टता असणं गरजेचं आहे. त्यामुळे तिसऱ्या आणि चौथ्या वर्षाला आणि त्यानंतरही वाचायची संधी मिळाली, लोकांशी बोलायची संधी मिळाली, आजही मिळते त्यातून स्वतःला सारखं घासत-पुसत राहायचं. आणि ती सुस्पष्टता मिळवत राहायची. त्यातून तुम्हाला आत्मविश्वास येतो आणि कामामुळे तुम्हाला कळत राहतं.

खरं सांगायचं तर आपण जर योग्य कामात पडलो ना, तर बरेचसे संभ्रम पडतच नाहीत माणसाला. बऱ्याचदा काय होतं की आपण काम करणं सोडतो आणि उगाचच वैचारिक चर्चांमध्ये गुरफटून राहतो. त्यामुळे आपले संभ्रम खूप जास्त वाढतात. मला आईचं हे विशेष वाटतं की ती कधीच गोंधळत नाही. आता मी हे करु का ते? हा निर्णय घ्यावा की तो? असे प्रश्न तिला सहसा पडत नाहीत. तिला उत्तर माहीत असतं आतूनच. आणि ती करते. आणि त्या निर्णयाशी ठाम राहण्याचं धाडस तिच्याकडे आहे. मुळमुळीतपणा नाही. याचा नक्कीच आपल्यावर परिणाम होतो. आयुष्यात आपल्याला कशाला महत्त्व द्यायचंय, आपले मापदंड काय आहेत - बाहेरची जी व्यवस्था आपले मानदंड आणि मापदंड ठरवते ते भाडोत्री मापदंड आम्ही आमचे म्हणून स्वीकारतो. माझ्यासाठीचे मापदंड काय आहेत ते माझे मी ठरवायला हवेत. संगणक अभियंत्यानी अमूकच गोष्टी केल्या पाहिजेत अशी महाराष्ट्रातली मानसिकता आहे, म्हणून मी तेच करायचं असं नाही. बाहेरचे मापदंड झुगारून आपण आपले मापदंड तयार करावेत, हे ही त्यांच्याकडून शिकण्यासारखं आहे.

अजून एक मुद्दा जो माझ्यावर परिणाम करुन गेला, तो म्हणजे 'निर्माण'चं माझं शिबिर सुरु असताना एक दिवशी संध्याकाळी बाबा असं म्हणाले होते, की Rani and I were blessed with lack of personal ambition (सुदैवाने राणीला आणि मला वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नव्हती!). मी त्या वेळेला ते वाक्य लिहून घेतलं होतं. मला असं वाटलं, की ते काहीतरी भारी बोलले आहेत. खरं सांगायचं तर मला ते फारसं कळलं नव्हतं. त्याचा जो शब्दशः अर्थ आहे तो तर लगेच कळतो, पण त्यामागचा गर्भितार्थ काही मला कळला नव्हता. जवळपास एक-सव्वा वर्ष लागलं त्याला. त्याकाळात मी माझे माझे अनुभव घेत होतो, वाचन करत होतो, 'निर्माण'ची प्रक्रिया वाढत होती, मी उत्क्रांत जीवशास्त्राचा त्यावेळी भरपूर अभ्यास केला, त्या नंतर सिमँटेकला गेलो. अंदाजे २००८ मधल्या मार्चमध्ये कधीतरी एकदा सकाळी अचानक बाबा जे म्हणाले होते, त्याचा अर्थ उमजला. माझे आईवडील समाजासाठी खूप महत्त्वाकांक्षी आहेत. म्हणजे समाज कसा घडावा, चालावा, यासाठी त्यांच्या मनात खूप उच्च मानकं असतात. म्हणजे 'कुछ भी किया तो चलता है', काहीही करा, कसंही राहा तरी ते चालवून घेऊ असं मानणाऱ्यातले ते बिलकूल नाहीत. अन्याय दूर व्हावा, गरिबी मिटावी, सगळयांना चांगलं आरोग्य लाभावं, चांगलं शिक्षण मिळावं अशा त्यांच्या सामाजिक महत्त्वाकांक्षा मोठ्या आहेत. पण माझं करिअर पुढे जावं, मला लोकांनी चांगलं म्हणावं, मला खूप प्रसिद्धी-पैसा मिळाला पाहिजे अशा त्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा जशा वगैरे नाहीत.

मला ज्या दिवशी हा अर्थ जाणवला, तेव्हा एकदम हलकं हलकं वाटायला लागलं. मला असं वाटायला लागलं की आपल्या अंगावरचे साखळदंड कुणीतरी काढून घेत आहे. आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेला फुंकर न मारता, आपण त्याहीपेक्षा मोठ्या अशा सामाजिक महत्त्वाकांक्षेत स्वतःला विलीन करु टाकू शकतो असा विचार आला. आता माणसाला कुठलीच महत्त्वाकांक्षा नसेल तर तो कामच करणार नाही काहीच न करता बसून राहील. त्यामुळे समाजात असे बदल घडावेत अशी कळकळ वाटणं महत्त्वाचं आहे. मला हे १००% जमलंय असा माझा मुळीच दावा नाही. मध्येमध्ये स्वार्थ प्रबळ होतो, मग जातात काही दिवस नैराश्यात. पण परत स्वतःला या सगळ्याची आठवण करुन दिली की सुसंवाद साधला जातो. पण त्यातला मी-मी असा भाव जितका कमी करता येईल तितकं आपण मुक्त आणि आनंदी राहतो. हे जेव्हापासून लक्षात तेव्हापासून माझा प्रवास अधिक आनंददायी आणि सुकर होतोय.